RNI No. MAHBIL /2009/35530

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३२(३)] शुक्रवार, ऑगस्ट २१, २०१५/श्रावण ३०, शके १९३७ [पृष्ठे ११, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—**महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम. . . पृष्ठे १–११

दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डॉ. मंगला ठोंबरे,**
प्रभारी प्रारूपकार-*नि*-सहसचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी एक सर्वसमावेशक कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ प्रख्यापित केला होता ; (२०१५ चा महा. अध्या. ५.)

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

**आणि, ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) तो, कोणतेही कायदे, नियम, अधिसूचना, आदेश, शासन निर्णय अथवा अन्य कोणतेही संलेख यांच्या तरतुदींनुसार पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांना लागू असेल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " मुख्य आयुक्त " किंवा " आयुक्त " याचा अर्थ, कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त किंवा, यथास्थिति, राज्य सेवा हक्क आयुक्त, असा आहे;

(ख) " आयोग " याचा अर्थ, कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, असा आहे;

(ग) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, शिस्तभंगविषयक प्राधिकारी किंवा, यथास्थिति, नियंत्रक अधिकारी, असा आहे;

(घ) " विभाग " याचा अर्थ, राज्य शासनाचा किंवा, यथास्थिति, एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाचा विभाग, असा आहे;

(ङ) " पदनिर्देशित अधिकारी " याचा अर्थ, ज्याने पात्र व्यक्तीला लोकसेवा देणे आवश्यक आहे असा अधिकारी, असा आहे;

(च) " विभागीय आयुक्त " याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ६ अन्वये राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला आयुक्त, असा आहे ; १९६६ चा महा. ४१.

(छ) " पात्र व्यक्ती " याचा अर्थ, लोकसेवा प्राप्त करण्यासाठी पात्र असलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये कोणत्याही कायदेशीर व्यक्तीचाही समावेश होतो ;

(ज) " प्रथम अपील प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(झ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ञ) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, कायद्याद्वारे घटित केलेले कोणतेही प्राधिकरण, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक वसाहत, नियोजन प्राधिकरण, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था, असा आहे ; आणि त्यामध्ये, विकास प्राधिकरणे किंवा इतर सांविधिक किंवा असांविधिक संस्था यांचा समावेश होतो;

(ट) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ठ) "सार्वजनिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

(क) शासनाचा कोणताही विभाग किंवा प्राधिकरणे;

(ख) (एक) राज्यामध्ये, भारताच्या संविधानाद्वारे किंवा त्याअन्वये ;

(दोन) राज्य विधानमंडळाने केलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे ;

(तीन) शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे,

स्थापन किंवा घटित केलेली कोणतीही संघटना किंवा प्राधिकरण किंवा निकाय किंवा महामंडळ किंवा संस्था किंवा एखादे स्थानिक प्राधिकरण, असा आहे ;

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

(ग) आणि त्यामध्ये,–

(एक) राज्य शासनाची मालकी, नियंत्रण असलेली किंवा त्याने वित्त पुरवठा केलेली संस्था, सहकारी संस्था, शासकीय कंपनी किंवा प्राधिकरण; किंवा

(दोन) राज्य शासनाकडून वित्तीय सहाय्य मिळणारी कोणतीही अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो;

(ड) " लोकसेवा " याचा अर्थ, कलम ३ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा सेवा, असा आहे;

(ढ) " सेवा हक्क " याचा अर्थ, सार्वजनिक प्राधिकरणाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा नियत कालमर्यादेत लोकसेवा प्राप्त करण्याचा पात्र व्यक्तीचा हक्क, असा आहे ;

(ण) " द्वितीय अपील प्राधिकारी " याचा अर्थ, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने कलम ८ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(प) " नियत कालमर्यादा " याचा अर्थ, ज्या कालमर्यादेच्या आत पदनिर्देशित अधिकाऱ्याने एखाद्या पात्र व्यक्तीला लोकसेवा द्यावयाची आहे अशी कलम ३ अन्वये अधिसूचित केलेली कालमर्यादा, असा आहे.

लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे.

**३.** (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील.

(२) सार्वजनिक प्राधिकरण, त्याने पुरवावयाच्या लोकसेवांची सूची, तसेच नियत कालमर्यादा, विहित नमुना किंवा शुल्क, कोणतेही असल्यास, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी यांचा तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि तसेच त्याच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर, कोणतेही असल्यास, प्रदर्शित करील किंवा प्रदर्शित करण्याची व्यवस्था करील.

नियत कालमर्यादेत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क.

**४.** (१) प्रत्येक पात्र व्यक्तीस, कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, या अधिनियमानुसार राज्यातील लोकसेवा नियत कालमर्यादेच्या आत प्राप्त करण्याचा हक्क असेल.

(२) सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रत्येक पदनिर्देशित अधिकारी, कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, नियत कालमर्यादेच्या आत पात्र व्यक्तीला लोकसेवा देईल :

परंतु, निवडणुकीच्या कालावधीत त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, विहित केल्याप्रमाणे नियत कालमर्यादा राज्य शासनास वाढवता येईल.

नियत कालमर्यादेत लोकसेवा पुरविणे.

**५.** (१) लोकसेवा प्राप्त करण्यासाठी कोणत्याही पात्र व्यक्तीस पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. अर्ज मिळाल्याची रीतसर पोच देण्यात येईल आणि अर्जदारास, असा अर्ज निकाली काढण्यासाठी नियत केलेल्या कालमर्यादेसह, असा अर्ज मिळाल्याचा दिनांक आणि ठिकाण, विशिष्ट अर्ज क्रमांक, लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत, कळविण्यात येईल. लोकसेवा प्राप्त करण्यासाठी सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला आवश्यक तो अर्ज, पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा अर्ज स्वीकारण्यास जिला यथोचितरीत्या प्राधिकृत केले असेल अशा एखाद्या व्यक्तीला ज्या दिनांकास मिळाला असेल त्या दिनांकापासून नियत कालमर्यादा मोजली जाईल.

(२) पदनिर्देशित अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर नियतकालमर्यादेत एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अर्ज फेटाळील. पदनिर्देशित अधिकारी, अर्जदाराला, त्याच्या आदेशाविरुद्ध अपील करण्याचा कालावधी आणि ज्याच्याकडे पहिले अपील दाखल करता येईल त्या प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम, त्याच्या कार्यालयीन पत्त्यासह, लेखी कळवील.

अर्जाच्या स्थितीची पाहणी.

**६.** (१) कोणत्याही लोकसेवांसाठी अर्ज केलेल्या प्रत्येक पात्र व्यक्तीला, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून एक विशिष्ट अर्ज क्रमांक देण्यात येईल, जेणेकरून जेथे ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, तो आपल्या अर्जाच्या स्थितीची, ऑनलाईन पाहणी करू शकेल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

(२) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, जेथे अशी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, लोकसेवांच्या सर्व अर्जांची स्थिती ऑनलाईन अद्ययावत ठेवण्यास कर्तव्यबद्ध असेल.

लोकसेवा देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**७.** शासन, नियत कालमर्यादेत संबंधित लोकसेवा पुरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना प्रोत्साहन व प्रेरणा देईल.

अपील प्राधिकाऱ्यांची नियुक्ती.

**८.** (१) सार्वजनिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशी यथोचित कार्यपद्धती अनुसरुन, लोकसेवांसाठीचा पात्र व्यक्तींचा अर्ज फेटाळल्याच्या किंवा त्या लोकसेवा देण्यास विलंब केल्याच्या विरूद्ध तिने दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय देण्यासाठी प्रथम अपील प्राधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जा असलेल्या, गट "ब" दर्जाच्या किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करील.

(२) सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध एखाद्या पात्र व्यक्तीने तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याने दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय देण्यासाठी द्वितीय अपील प्राधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जा असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करील.

अपील.

**९.** (१) कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये जिचा अर्ज फेटाळण्यात आला असेल किंवा जिला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा दिली नसेल अशा कोणत्याही पात्र व्यक्तीस, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल :

परंतु, जर अपीलकर्त्याला त्या मुदतीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत प्रथम अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली तर, त्यास, अपवादात्मक प्रकरणी, जास्तीत जास्त नव्वद दिवसांच्या कालावधीस अधीन राहून, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील, अपील दाखल करून घेता येईल.

(२) प्रथम अपील प्राधिकाऱ्यास, तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा नियत कालमर्यादेपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीच्या आत पात्र व्यक्तीला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळता येईल :

परंतु, अपिलावर निर्णय देण्यापूर्वी, प्रथम अपील प्राधिकारी,अपीलकर्त्याला तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याला, आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

(३) अपीलकर्त्यास, ज्या दिनांकास प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा कोणताही आदेश मिळाला नसेल त्याबाबतीत, पहिले अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांनंतर द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे, प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध दुसरे अपील दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्याला त्या मुदतीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत द्वितीय अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली तर, त्यास, अपवादात्मक प्रकरणी, जास्तीत जास्त नव्वद दिवसांच्या कालावधीस अधीन राहून, तीस दिवसांचा किंवा, यथास्थिति, पंचेचाळीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील, अपील दाखल करून घेता येईल.

(४) द्वितीय अपील प्राधिकाऱ्यास, तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत अपीलकर्त्याला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा त्यास ते अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत अशा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळता येईल :

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

परंतु, कोणताही आदेश काढण्यापूर्वी, द्वितीय अपील प्राधिकारी, अपीलकर्त्याला तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याला, आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

(५) या कलमाअन्वये अपिलावर निर्णय करताना, प्रथम अपील प्राधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी यांना पुढील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :—

१९०८ चा ५.

(क) दस्तऐवज किंवा अभिलेख सादर करण्यास फर्मावणे व त्याची तपासणी करणे ;

(ख) सुनावणीसाठी समन्स पाठविणे ; आणि

(ग) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

शास्ती.

**१०.** (१)(क) जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पुरेशा व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यात कसूर केली आहे, असे प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे मत झाले असेल तर, तो त्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर, पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील.

(ख) पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पुरेशा व वाजवी कारणाशिवाय नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा देण्यात कसूर केली आहे, असे द्वितीय अपील प्राधिकाऱ्याचेदेखील मत झाले असेल तर, त्यास, कारणे लेखी नमूद करून, प्रथम अपील प्राधिकाऱ्याने लादलेली शास्ती कायम ठेवता येईल किंवा त्यात बदल करता येईल :

परंतु, प्रथम अपील प्राधिकारी किंवा द्वितीय अपील प्राधिकारी, पदनिर्देशित अधिकाऱ्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(२) प्रथम अपील प्राधिकाऱ्याने, कोणत्याही पुरेशा व वाजवी कारणाशिवाय विनिर्दिष्ट कालावधीत अपिलावर निर्णय देण्यात वारंवार कसूर केली होती किंवा चूक करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्याला वाचविण्याचा गैरवाजवी प्रयत्न केला होता असे मुख्य आयुक्ताचे किंवा आयुक्ताचे मत झाले असेल तेव्हा, तो, प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर, पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील :

परंतु, प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

शास्ती वसुलीची कार्यपद्धती.

**११.** संबंधित अपील प्राधिकारी किंवा आयोग, लादण्यात आलेल्या शास्तीच्या रकमेबद्दल पदनिर्देशित अधिकाऱ्यास किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्यास तसेच सार्वजनिक प्राधिकरणास लेखी कळवील. पदनिर्देशित अधिकारी किंवा, यथास्थिति, प्रथम अपील प्राधिकारी, असे कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, शास्तीच्या रकमेचा भरणा करील व असे करण्यात कसूर केल्यास, सक्षम प्राधिकारी, संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थिति, प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या वेतनातून शास्तीची रक्कम वसूल करील.

वारंवार केल्या जाणाऱ्या कसुरीबद्दल पदनिर्देशित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यपद्धती.

**१२.** (१) सक्षम प्राधिकारी, संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याने लोकसेवा देण्यामध्ये वारंवार केलेल्या कसुरीबद्दल अथवा लोकसेवा देण्यामध्ये वारंवार केलेल्या विलंबाबद्दल तसेच, अपील प्राधिकाऱ्यांच्या निदेशांचे अनुपालन करण्यात वारंवार केलेल्या कसुरीबद्दल, द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडून माहिती मिळाल्यानंतर, पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत अशा पदनिर्देशित अधिकाऱ्यावर त्याच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का सुरू करण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावील. सक्षम प्राधिकारी, त्या पदनिर्देशित अधिकाऱ्याविरुद्ध लागू असलेल्या वर्तणूक व शिस्तभंगविषयक नियमांनुसार समुचित अशी शिस्तभंगाची कारवाई सुरू करील.

(२) ज्याच्याविरुद्ध अशी नोटीस काढण्यात आली असेल त्या पदनिर्देशित अधिकाऱ्यास, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे अभिवेदन सादर

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

करता येईल. विनिर्दिष्ट कालावधीच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याला असे कोणतेही अभिवेदन न मिळाल्यास किंवा प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास, सक्षम प्राधिकारी, सार्वजनिक प्राधिकरणाच्या वर्तणूक व शिस्तभंगविषयक नियमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागीय चौकशी सुरू करील :

परंतु, सक्षम प्राधिकाऱ्यास त्या पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या पुष्ट्यर्थ वाजवी आणि समर्थनीय कारणे असल्याचे दिसून आले, आणि पात्र व्यक्तीला सेवा देण्यात झालेला विलंब हा त्याच्यामुळे नव्हे तर, अन्य पदनिर्देशित अधिकाऱ्यामुळे झाला होता अशा निष्कर्षाप्रत तो आला असेल तर, सक्षम प्राधिकाऱ्याने त्या पदनिर्देशित अधिकाऱ्याविरुद्धची नोटीस मागे घेणे विधिसंमत असेल.

(३) या अधिनियमाअन्वये अशा पदनिर्देशित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करताना, सक्षम प्राधिकारी, त्या बाबतीत आदेश देण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्त्वांचे पालन करील आणि तो, पदनिर्देशित अधिकाऱ्याला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

महाराष्ट्र राज्य सेवाहक्क आयोग घटित करणे.

**१३.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" या नावाने संबोधला जाणारा एक आयोग, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घटित करील :

परंतु, राज्य शासनाकडून आयोग घटित करण्यात येईपर्यंत, शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आयोगाचे अधिकार व कार्ये, प्रत्येक महसुली विभागातील विभागीय आयुक्ताकडे किंवा इतर कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

(२) महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल :—

(क) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, ज्याची अधिकारिता मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यांपुरती असेल; आणि

(ख) मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यांचे क्षेत्र वगळून प्रत्येक महसुली विभागासाठी एक राज्य सेवा हक्क आयुक्त, ज्याची अधिकारिता संबंधित महसुली विभागापुरती असेल.

(३) राज्यपाल, पुढील व्यक्तींनी मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार मुख्य आयुक्ताची आणि आयुक्तांची नियुक्ती करतील :—

(एक) मुख्यमंत्री, जे या समितीचे अध्यक्ष असतील;

(दोन) विधानसभेतील विरोधी पक्षनेता; आणि

(तीन) मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित करावयाचे एक कॅबिनेट मंत्री.

**स्पष्टीकरण.—**शंकानिरसनार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, विधानसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून एखाद्या व्यक्तीला मान्यता देण्यात आली नसेल त्याबाबतीत, विधानसभेतील, विरोधी गटांपैकी सर्वात मोठ्या गटाच्या नेत्यास विरोधी पक्षनेता म्हणून मानण्यात येईल.

(४) आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, निदेशन व व्यवस्थापन मुख्य आयुक्ताकडे निहित असेल ज्यास आयुक्त सहाय्य करतील आणि त्यास, आयोगास वापरता येत असतील असे सर्व अधिकार वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती करता येतील.

(५) मुख्य आयुक्त आणि आयुक्त हे, शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

(६) मुख्य आयुक्त किंवा आयुक्त हे, संसदेचे सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या विधानमंडळाचे सदस्य असणार नाहीत, किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाहीत, किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाहीत किंवा कोणताही उद्योगधंदा अथवा व्यवसाय करणार नाहीत.

(७) आयोगाचे मुख्यालय हे, मुंबई येथे असेल आणि आयुक्तांची कार्यालये प्रत्येक महसुली विभागांमध्ये असतील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

**१४.** (१) मुख्य आयुक्त आणि आयुक्त ज्या दिनांकास आपआपली पदे धारण करतील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत अथवा त्यांच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, ते पद धारण करतील, आणि ते पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाहीत. पदावधी व सेवेच्या शर्ती.

(२) मुख्य आयुक्त किंवा आयुक्त, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, राज्यपालाच्या समक्ष किंवा त्यासंदर्भात त्यांनी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या समक्ष, विहित नमुन्यानुसार, शपथ किंवा प्रतिज्ञा घेतील व स्वाक्षरी करतील.

(३) मुख्य आयुक्तास किंवा एखाद्या आयुक्तास, कोणत्याही वेळी, राज्यपालास उद्देशून आपल्या सहीनिशी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(४) मुख्य आयुक्ताला आणि आयुक्तांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ह्या, राज्य मुख्य माहिती आयुक्ताला आणि राज्य शासनाच्या मुख्य सचिवाला अनुक्रमे असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या अटी व शर्ती या सारख्याच असतील. कोणतेही निवृत्तिवेतनविषयक लाभ किंवा सेवानिवृत्तिनंतरचे इतर लाभ मुख्य आयुक्त किंवा, यथास्थिति, आयुक्त या पदांमधून उपार्जित होणार नाहीत :

परंतु, मुख्य आयुक्त किंवा एखादा आयुक्त हा, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या सेवेच्या संबंधात, विकलांगता किंवा जखम निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त अन्य निवृत्तिवेतन घेत असेल तर, मुख्य आयुक्त किंवा आयुक्त म्हणून त्याच्या सेवेच्या संबंधातील वेतनातून, सेवानिवृत्ति-उपदानाच्या रकमेएवढे निवृत्तिवेतन वगळून अंशराशीकृत निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग व इतर स्वरूपातील सेवानिवृत्ति-लाभ यांची मिळून होणारी निवृत्तिवेतनाएवढी रक्कम कमी करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, मुख्य आयुक्तास किंवा एखाद्या आयुक्तास, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, शासनामध्ये किंवा कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये स्थापन केलेल्या महामंडळात किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील शासकीय कंपनीत केलेल्या आधीच्या कोणत्याही सेवेच्या संबंधातील सेवानिवृत्तिलाभ मिळत असतील तर, मुख्य आयुक्त किंवा आयुक्त म्हणून त्याच्या सेवेच्या संबंधातील वेतनातून, सेवानिवृत्ति-लाभाइतकी निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईलः

परंतु तसेच, मुख्य आयुक्ताचे व आयुक्तांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये, त्यांच्या नियुक्तीनंतर, त्यांना अहितकारक ठरतील असे बदल करण्यात येणार नाहीत.

(५) शासन, मुख्य आयुक्तास व आयुक्तांना, या अधिनियमाअन्वये त्यांची कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील इतके अधिकारी व कर्मचारी पुरवील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नियुक्त केलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, विहित केल्याप्रमाणे असतील.

**१५.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यपालांना, मुख्य आयुक्तास किंवा कोणत्याही आयुक्तास, जर मुख्य आयुक्त किंवा आयुक्त,— मुख्य आयुक्तास किंवा आयुक्तांना पदावरून दूर करणे.

(क) अमुक्त नादार असेल ; किंवा

(ख) राज्यपालांच्या मते, ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव आहे अशा एखाद्या अपराधाबद्दल तो दोषी ठरला असेल ; किंवा

(ग) तो, त्याच्या पदावधीत, त्याच्या पदाच्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कोणतीही वेतनी सेवा करीत असेल ; किंवा

(घ) राज्यपालांच्या मते, शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिक दुर्बलतेच्या कारणामुळे तो पदावर राहण्यास अयोग्य झाला असेल ; किंवा

(ङ) मुख्य आयुक्त किंवा आयुक्त म्हणून त्याच्या कार्यांमध्ये बाधा पोहोचेल असे त्याचे आर्थिक किंवा इतर हितसंबंध असतील तर,

त्यास, आदेशाद्वारे पदावरून दूर करता येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य आयुक्त किंवा कोणताही आयुक्त यांना पदावरून दूर करण्याची कारणे आणि अशा प्रस्तावाच्या पुष्ट्यर्थचे साहित्य यांसह, त्यांना पदावरून दूर करण्याबाबत चौकशी करण्याची आणि शिफारस करण्याची मागणी असणारा निर्देश राज्य शासनाकडून मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे करण्यात आला असल्याखेरीज, मुख्य आयुक्त किंवा कोणताही आयुक्त यांना, त्यांच्या पदावरुन दूर करता येणार नाही.

आयोगाचे अधिकार व कार्ये.

**१६.** (१) या अधिनियमाच्या उचित अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्या रीतीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे हे, आयोगाचे कर्तव्य असेल. या प्रयोजनार्थ, आयोगास, पुढील गोष्टी करता येतील :—

(क) या अधिनियमानुसार लोकसेवा देण्यात कसूर केल्याबाबतची, स्वाधिकारे दखल घेणे आणि त्यास योग्य वाटतील त्याप्रमाणे अशी प्रकरणे निकालात काढण्यासाठी निर्देशित करणे ;

(ख) लोकसेवा देणारी कार्यालये आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी यांच्या कार्यालयांची तपासणी पार पाडणे ;

(ग) कोणत्याही पदनिर्देशित अधिकाऱ्याने किंवा अपील प्राधिकाऱ्यांनी या अधिनियमाअन्वये त्यांच्याकडे सोपवलेली कार्ये योग्यपणे पार पाडण्यात कसूर केली असेल तर त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची शिफारस करणे ;

(घ) लोकसेवा देण्याच्या कार्यपद्धतीमध्ये, ज्यामुळे लोकसेवा देण्यात अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल, असे बदल करण्यासाठी शिफारस करणे :

परंतु, अशी एखादी शिफारस करण्यापूर्वी, आयोग लोकसेवा देणाऱ्या अशा विभागाच्या प्रभारी प्रशासकीय सचिवाबरोबर विचारविनिमय करील ;

(ङ) लोकसेवा कार्यक्षमपणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजना करण्यासाठी शिफारस करणे ;

(च) सार्वजनिक प्राधिकरणांनी लोकसेवा देण्याबाबत, संनियंत्रण करणे ;

(छ) कलम १८ अन्वये त्याच्याकडे दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी घेणे व त्यावर निर्णय देणे.

(२) आयोगाला, या कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) व्यक्तींना समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि तपासणी करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणतेही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे ; आणि

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

आयोगाच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही.

**१७.** राज्य शासन, कलम १६ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) आणि (ङ) अन्वये, आयोगाने केलेल्या शिफारशींवर विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती, तीस दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचारविनिमय करून ठरविण्यात येईल अशा त्यानंतरच्या कालावधीत, आयोगाकडे पाठवील.

आयोगाकडे अपील करणे.

**१८.** (१) द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत आयोगाकडे अपील करता येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

(२) मुख्य आयुक्त किंवा, यथास्थिति, आयुक्त, सर्व पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत, असे अपील निकालात काढील. आयोगाला, पदनिर्देशित अधिकाऱ्यावर किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर शास्ती लादता येईल किंवा लादलेल्या शास्तीमध्ये बदल करता येईल किंवा ती रद्द करता येईल आणि अशी प्रदान केलेली शास्ती, कोणतीही असल्यास, परत करण्याचा आदेश देता येईल.

**१९.** (१) आयोग, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर, मागील वर्षामधील आपल्या कार्याचा तसेच सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याच्या कामगिरीच्या मूल्यमापनाबाबतचा अहवाल तयार करील आणि तो राज्य शासनाला सादर करील. वार्षिक अहवाल.

(२) राज्य शासन, आयोगाने सादर केलेला वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

**२०.** (१) लोकसेवा मिळण्यासाठी पात्र व्यक्तींकडून विविध प्रमाणपत्रे, दस्तऐवज, शपथपत्रे, इत्यादी सादर करण्याबाबतची मागणी कमी करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणे कालमर्यादित प्रभावी उपाययोजना करतील. सार्वजनिक प्राधिकरण, अन्य विभागाकडून किंवा सार्वजनिक प्राधिकरणांकडून थेटपणे आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी समन्वयाने प्रयत्न करतील. नियत कालमर्यादेत लोकसेवा देण्याची संस्कृती विकसित करणे.

(२) पात्र व्यक्तींच्या अपेक्षांच्याप्रती पदनिर्देशित अधिकाऱ्यांना संवेदनशील करणे आणि नियत कालमर्यादेत पात्र व्यक्तींना लोकसेवा देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे व ई-प्रशासन संस्कृतीचा अवलंब करणे हे यामागील प्रयोजन व उद्दिष्ट असल्याकारणाने, लोकसेवा नियत कालमर्यादेत देण्यात पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून होणारी कसूर ही, गैरवर्तणूक मानली जाणार नाही.

(३) द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडून किंवा मुख्य आयुक्ताकडून, किंवा यथास्थिति, आयुक्ताकडून, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून होणाऱ्या वारंवार कसुरीबद्दल लेखी माहिती प्राप्त झाल्यावर, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रमुख, कसूरदार अधिकाऱ्यावर कारणे दाखवा नोटीस बजावून व त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन, तशा आशयाच्या निष्कर्षाची नोंद केल्यानंतर, योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यास सक्षम असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, जर एखादा पदनिर्देशित अधिकारी एका वर्षात त्याच्याकडे प्राप्त झालेल्या एकूण पात्र प्रकरणांपैकी दहा टक्के इतक्या प्रकरणांमध्ये कसूर करील तर, त्यास वारंवारचा कसूरदार मानण्यात येईल.

(४) लोकसेवा ठराविक कालावधीत देण्यामध्ये वाढ करण्यासाठी आणि त्याची सुनिश्चिती करण्यासाठी सर्व पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकारी नियतकालिक प्रशिक्षण घेतील. राज्य शासन, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची सोय करील आणि ते प्रशिक्षण, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मूलभूत पाठ्यक्रमातील अभ्यासक्रमाचाच एक भाग असू शकेल.

(५) (क) पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखास, ज्याच्या विरुद्ध एका वर्षात कसुरीची कोणतीही नोंद करण्यात आलेली नसेल व जो नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा देत असेल अशा पदनिर्देशित अधिकाऱ्याला शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल इतकी रोख रक्कम प्रोत्साहन म्हणून, प्रशस्ती प्रमाणपत्रासह, देता येईल, आणि तसेच, संबंधित अधिकाऱ्याच्या सेवा अभिलेखात त्याबाबतची नोंद देखील घेण्यात येईल.

(ख) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करताना जी सार्वजनिक प्राधिकरणे उत्कृष्ट कामगिरी पार पाडतील अशा प्राधिकरणांचा गौरव करण्यासाठी योग्य पारितोषिके देता येतील.

**२१.** शासन, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आणि पदनिर्देशित अधिकारी, अपील प्राधिकारी आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांच्या प्रशिक्षणासाठी पुरेशा निधीचे नियत वाटप करील. निधीचे नियत वाटप.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

शिस्तविषयक नियमांना तरतुदी पूरक असणे.

**२२.** या अधिनियमाची कलमे ९, १२ आणि कलम २० चे पोट-कलम (३) यांच्या तरतुदी शासकीय, किंवा, यथास्थिति, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना लागू असलेले, शिस्तविषयक व वित्तीय नियम आणि असे इतर सेवा नियम व विनियम यांना पूरक असतील.

खोटी किंवा चुकीची माहिती, इत्यादी देणाऱ्या पात्र व्यक्ती विरुद्धची कारवाई.

**२३.** जर पात्र व्यक्ती, अर्जात जाणून बुजून खोटी किंवा चुकीची माहिती देत असेल किंवा अर्जासोबत खोटे दस्तऐवज सादर करीत असेल आणि अशा माहितीच्या किंवा दस्तऐवजांच्या आधारे, या अधिनियमाअन्वये लोकसेवा मिळवित असेल तर, अशा प्रकरणी, अंमलात असलेल्या दंडविधिच्या संबंधित तरतुदींअन्वये त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

निदेश देण्याचा शासनाचा अधिकार.

**२४.** राज्य शासनास, या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष असे लेखी निदेश सार्वजनिक प्राधिकरणाला देता येतील आणि सार्वजनिक प्राधिकरणावर, अशा निदेशांचे पालन करणे व त्यानुसार कार्य करणे, बंधनकारक असेल.

सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**२५.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

अधिकारितेस रोध.

**२६.** कोणत्याही दिवाणी न्यायालयास, न्यायाधिकरणास किंवा अन्य प्राधिकरणास, ज्या बाबींवर आयोगाला आणि अपील प्राधिकाऱ्यांना या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये निर्णय करण्याचे अधिकार प्रदान केलेले असतील, अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात निर्णय करण्याची अधिकारिता असणार नाही.

अधिनियम अन्य कायद्यांवर अधिभावी ठरणे.

**२७.** या अधिनियमान्वये अधिसूचित केलेल्या सेवांच्या आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या संबंधात, या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा या अधिनियमाखेरीज अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही नियमांमध्ये, त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील.

नियम करण्याचा अधिकार.

**२८.** (१) शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि तशा आशयाचा आपला निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

COURT BOOK EMPOWERING LEGAL CLARITY

**२९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

२०१५ चा महा. अध्या. ५.

**३०.** (१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.